**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ६५ लाख लाभार्थ्यांना ई-प्रॉपर्टी कार्डचे वितरण

- तंत्रज्ञानाच्या लोकशाहीकरणासाठी केंद्र सरकारनं विविध उपक्रम राबवल्याचं माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांचं प्रतिपादन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवर 'मन की बात'द्वारे जनतेशी संवाद साधणार

**आणि**

- चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेसाठी रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघ जाहीर

**<><><><><>**

स्वामित्व योजनेअंतर्गत दिलं जाणारं ई प्रॉपर्टी कार्ड हा केवळ दस्तऐवज नसून आर्थिक सुरक्षेची हमी असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. स्वामित्व योजनेअंतर्गत गाव पातळीवर जमिनीच्या मालकी हक्कांविषयी संपूर्ण माहिती देणाऱ्या ई प्रॉपर्टी कार्डाचं वितरण आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. स्वामित्व आणि भू आधार या दोन्ही योजना ग्रामीण भारताच्या विकासाचा आधार आहेत, असंही ते म्हणाले. छोट्या गावांना स्वामित्व योजनेच्या होणाऱ्या लाभाबद्दल बोलताना प्रधानमंत्री म्हणाले…

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री (१९ सेकंद)**

या कार्यक्रमात देशभरातली दहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या पन्नास हजाराहून अधिक गावांतली ६५ लाख ई-प्रॉपर्टी कार्डस् प्रधानमंत्र्यांच्या हस्ते वितरित करण्यात आली. यावेळी प्रधानमंत्र्यांनी ठिकठिकाणच्या लाभार्थ्यांशी

दूरस्थ पद्धती संवाद साधला. नागपुरातल्या रोशन पाटील या शेतकऱ्याशी बोलताना प्रधानमंत्री म्हणाले…

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री (४४ सेकंद)**

जमीन मालकाला त्याच्या जमिनीची कायदेशीर सनद मिळवून देणं हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ३ लाख १७ हजार गावांमध्ये ड्रोन सर्वेक्षण पूर्ण झालं आहे. दीड लाखांपेक्षा जास्त गावांसाठी सव्वा दोन कोटी प्रॉपर्टी कार्ड्स तयार करण्यात आली आहेत. राज्यातल्या ६० लाखांहून अधिक कुटुंबांना या योजनेचा थेट फायदा होईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. राज्यात विविध ठिकाणी लाभार्थ्यांना हे प्रॉपर्टी कार्ड मिळाले.

**<><><><><>**

देशात तंत्रज्ञानावर कोणत्याही विशिष्ट व्यक्तींची मक्तेदारी असू नये, तर ते सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावं, तंत्रज्ञानाचं लोकशाहीकरण व्हावं, हे उद्दिष्ट ठेवून गेल्या १० वर्षांत केंद्र सरकारने नवनवीन तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर दिला आहे, असं प्रतिपादन केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलं आहे. मुंबईत पॅन-आयआयटी वर्ल्ड ऑफ टेक्नॉलॉजी परिषदेच्या समारोप सत्रात ते आज बोलत होते.

पुढच्या १० वर्षांमध्ये संपूर्ण जगात मोठे राजकीय, भौगोलिक, आर्थिक बदल घडून येतील आणि येणारी कित्येक वर्षं घडणाऱ्या प्रत्येक मोठ्या स्थित्यंतरात भारताचा मोठा वाटा असेल, असं सांगून भारतीय तंत्रज्ञान संस्था अर्थात आयआयटीतून शिक्षण घेतलेल्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग करून या मोठ्या बदलाला हातभार लावावा, असं आवाहन वैष्णव यांनी केलं.

यूपीआय, राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, सेमीकंडक्टर क्षेत्र, फोरजी तंत्रज्ञान, वंदे भारत रेल्वेगाड्या, 'कवच' रेल्वे सुरक्षा यंत्रणा इत्यादींचा उल्लेख त्यांनी बोलताना केला. इथेच न थांबता, 'उत्पादनांचा देश' म्हणून उभं राहण्याचं आणि जगासमोरच्या समस्यांवर तोडगा काढण्याचं भारताचं लक्ष्य आहे, असं ते म्हणाले. त्यापूर्वी ठाण्यात बुलेट ट्रेनसाठी बांधण्यात येणाऱ्या बोगद्याच्या बांधकामाचा आढावा अश्विनी वैष्णव यांनी घेतला. बुलेट ट्रेन प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई, ठाणे, सूरत आणि अहमदाबादसारख्या शहरांच्या आर्थिक घडामोडींमध्ये लक्षणीय वाढ होईल, असं वैष्णव या आढाव्यानंतर म्हणाले.

**<><><><><>**

मुंबईकरांना लवकरच एकाच तिकिटावर उपनगरी रेल्वे, बेस्ट बस, मेट्रो, मोनो आणि एसटीने प्रवास करता येणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत ही माहिती दिली. या उपक्रमामुळे प्रवाशांना केवळ ३०० ते ५०० मीटर चालून सार्वजनिक वाहतूक सुविधेचा लाभ घेता येईल. एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जलद आणि सुलभ वाहतूक सेवा देण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**होल्ड देवेंद्र फडनवीस**

यामुळे वाहतुकीचे सुलभीकरण होऊन प्रवाशांचा वेळ वाचेल, वाहतूक व्यवस्थेतले अडथळे दूर होतील. तसंच महसूलवाढीसह सार्वजनिक सेवांचा अधिकाधिक वापर होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. तंत्रज्ञानाचा वापर वाढवून टॅक्सी आणि इतर सेवांसोबत या प्रणालीचे एकत्रिकरण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**<><><><><>**

राष्ट्रीय चाचणी संस्थेने जेईईच्या पहिल्या सत्राच्या परीक्षेसाठी प्रवेशपत्र जाहीर केलं आहे. बी. ई. आणि बी. टेक या अभ्यासक्रमांसाठी होणारी परीक्षा २२, २३ आणि २४ जानेवारी रोजी घेतली जाणार आहे. त्यासाठीचं प्रवेशपत्र आज जाहीर करण्यात आलं. इच्छुक विद्यार्थ्यांना संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर ती मिळू शकतील. येत्या २८, २९ आणि ३० जानेवारी रोजी बी. ई., बी. टेकसह आर्किटेक्ट, प्लॅनिंग या अभ्यासक्रमांसाठी जेईई परीक्षा घेतली जाणार आहे. त्यासाठीची प्रवेशपत्र लवकरच मिळतील असं संस्थेने पत्रकाद्वारे कळवलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशविदेशातल्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत.  हा या कार्यक्रमाचा एकशे अठरावा (११८) भाग आहे.

हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या तसंच आकाशवाणीचं संकेतस्थळ आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाईल ॲप वरून प्रसारित केला जाणार आहे. त्याशिवाय हा कार्यक्रम एआयआर न्यूज, डीडी  न्यूज, प्रधानमंत्री कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिनीवरून थेट प्रसारित केला जाणार आहे.

**<><><><><>**

अभिनेता सैफ अली खान याच्यावर झालेल्या हल्ला प्रकरणी रेल्वे पोलिसांनी छत्तीसगडमधील दुर्गमधून एकाला अटक केली आहे. **दु**र्ग रेल्वे स्थानकावरुन त्याला ताब्यात घेतलं. रात्रीपर्यंत मुंबई पोलीस तिथे पोहोचून त्याची चौकशी करतील आणि त्याचा ताबा घेतील.

**<><><><><>**

कोलकात्याच्या आर जी कार रुग्णालय बलात्कार आणि हत्या प्रकरणी सिएलदा न्यायालयानं आरोपी संजय रॉयला दोषी ठरवलं आहे. त्याच्या शिक्षेबद्दलचा आदेश येत्या सोमवारी न्यायालय जाहीर करेल. गेल्या ९ ऑगस्टला या वैद्यकीय महाविद्यालयात ३१ वर्षीय प्रशिक्षणार्थीवर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आल्याचं आढळलं होतं. उच्च न्यायलयाच्या आदेशानुसार या प्रकरणाचा तपास सीबीआयनं केला.

**<><><><><>**

मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातल्या ६ आरोपींना बीडच्या जिल्हा आणि सत्र न्यालयानं १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, महेश केदार, प्रतीक घुले, जयराम चाटे, सिद्धार्थ सोनवणे या ६ आरोपींच्या  पोलीस कोठडीची मुदत संपल्यानं आज त्यांना न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. सरकारी वकिलांनी आरोपींची पोलीस कोठडी मागितली नाही, त्यामुळे त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली.

**<><><><><>**

मराठा समाजाला कुणब्यांच्या वाट्याचं आरक्षण नको, सर्वेक्षण करून मराठा समाजातील जे मागास असतील त्यांना आरक्षण द्यावं, असं खासदार नारायण राणे म्हणाले. अखिल मराठा फेडरेशनच्या तिसऱ्या संमलनाचं उद्घाटन आज रत्नागिरीत झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

इराणमधल्या तेहरान इथं सर्वोच्च न्यायालयाच्या इमारतीत झालेल्या गोळीबारात २ न्यायाधीशांचा जागीच मृत्यू झाला तर १ न्यायाधीश जखमी झाले. हल्लेखोरानं या तिघांच्या दिशेनं गोळीबार केला होता.

**<><><><><>**

येत्या फेब्रुवारी महिन्यात सुरू होणार असलेल्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेसाठी बीसीसीआयनं १५ सदस्यीय संघाची आज घोषणा केली. रोहित शर्मा या संघाचा कर्णधार असेल, तर तर शुभमन गिलकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी दिली आहे. या दोघांशिवाय विराट कोहली, श्रेयस अय्यर, लोकेश राहुल, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजा यांचा संघात समावेश आहे.

या स्पर्धेआधी इंग्लंड विरोधात तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांची मालिकाही भारतीय संघ खेळणार आहे.

**//<><><><><>//**